NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in



**अभ्यासमंडळे विभाग**

जा. क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१-२२/6404 दिनांक: 19 AUG 2022

प्रति,

मा. प्राचार्य/प्राचार्या
सर्व संलग्नित महाविद्यालये
पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर.

मा. संचालक
विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले,
पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर.

विषय : चार ही विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर सुधारित अभ्यासक्रमांसाठी Double Degree and Improvement च्या नियमावली बाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सोलापूर विद्यापीठाच्या विद्यापरिषदेची ४९ वी बैठक दि. २७/०६/२०२२ रोजी पार पडली त्यातील विषय क्र. ९८ चा ठराव पारीत करण्यात आला.“चारही विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर सुधारित अभ्यासक्रमांसाठी Double Degree and Improvement ची नियमावली तयार करण्यासाठी BOD च्या दि. २३/०५/२०२२ रोजीच्या बैठकीत गठीत करण्यात आलेल्या समितीकडून तयार करण्यात आलेल्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली”

उपरोक्त Double Degree and Improvement ची नियमावली विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्ररिध्द करण्यात आलेली आहे. su.digitaluniversity.ac ⇨ BOS ⇨ Top Link ⇨ Circulars या मंथळयाखाली अपलोड करण्यात आली आहे.

सबब, गठीत करण्यात आलेल्या समितीकडून तयार करण्यात आलेली नियमावली सोबत जोडून पाठवित आहोत. उपरोक्त बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधीत अध्यापक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. सु. कि. पवार)
प्र.कुलसचिव

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव : १) मा.कुलगुरू महोदयांचे कार्यलय, पुअहोसोविसो.
२) मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, पुअहोसोविसो.
३) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुअहोसोविसो.
४) मा. संचालक, शैक्षणिक, संशोधन व विकास विभाग, पुअहोसोविसो.

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७८ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: htto://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: bos@sus.ac.inragistrar@sus.ac.in



# Double Degree ची नियमावली

| | |
|---|---|
| १. | जे विद्यार्थी पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठातून बी. ए. व बी. एस्सी पदवी ची परीक्षा उतीर्ण असतील त्यांनाच Double Degree ची सुविधा उपलब्ध आहे. |
| २. | बी. ए. भाग- २ व बी. एस्सी भाग- २ च्या वर्षामध्ये जे ऐच्छिक विषय असतील त्यापैकीच विषय घेऊन Double Degree करता येईल. |
| ३. | Double Degree साठी बी. ए. / बी. एस्सी Final Year साठी Compulsory English विषयांची आवश्यकता नाही. |
| ४. | Double Degree साठी विद्यार्थी प्रस्तुत विद्यापीठाशिवाय इतर विद्यापीठातून शिकून मूळ विद्यापीठात प्रवेश घेतल्यास प्रवेश विभागाकडून त्याची पात्रतेसाठी शिफारस करावी. प्रस्तुत विद्यापीठातील विद्यार्थ्यांची पुनश्च पात्रता कराण्याची आवश्यकता नाही. |
| ५. | Transfer Certificate आणि Migration Certificate जमा केल्यानंतरच त्याची पूर्वीची पात्रता गृहीत धरण्यात यावी. |
| ६. | Double Degree च्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचे सर्व प्रचलित नियम व प्रचलित अभ्यासक्रम बंधनकारक असतील. |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७८ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: htto://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: bos@sus.ac.inragistrar@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)




# श्रेणीसुधार (Class Improvement) करीता नियमावली

| | |
|---|---|
| १. | जे विद्यार्थी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत महविद्यालय/विद्यापीठ संकुल मधून पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण (PASS) असतील त्याना श्रेणीसुधार करण्यासाठी पध्दतीचा अवलंब करता येईल. |
| २. | जे विद्यार्थी सर्व पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण आहेत व ज्या विद्यार्थ्यांना श्रेणीमध्ये सुधार करावयाचा आहे (Class Improvement) अशा विद्यार्थ्याना ते पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासून ६ वर्षाच्या कालावधीमध्ये अशी श्रेणीसुधारची परीक्षा देण्यासाठी केवळ ३ संधी असतील. |
| ३. | श्रेणीसुधार साठी विद्यार्थ्यांना जे समकक्ष विषय (Equivalence) उपलब्ध आहेत त्या विषयाची परीक्षा देणे बंधनकारक राहील. |
| ४. | सत्र पध्दतीनुसार (Semester Wise) पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार परीक्षेसाठी पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमातील एकूण विषयांपैकी कोणतेही ४ विषय घेऊन परीक्षा देणेबंधनकारक असून सदर विद्यार्थ्याच्या ईच्छेनुसार ४ पेक्षा अधिक विषयांमधून परीक्षा देऊ शकतो. |
| ५. | श्रेंणीसुधार परीक्षेमध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, पारितोषिके व गुणवत्ता प्रमाणपत्र मिळणार नाही. |
| ६. | श्रेणीसुधार परीक्षेमध्ये प्रविष्ठ होऊन श्रेणीसुधार करण्यास अपयशी (पूर्वी च्या गुणापेक्षा कमी गुण मिळाल्यास/अनुत्तीर्ण) झाल्यास विद्यार्थ्यांचे पूर्वीचे मिळालेले गुण गाह्य धरले जातील. |